**अनेक विंग असलेल्या एका इमारतीच्या विंगनिहाय**
**<u>सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करणेबाबत.</u>**

महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन परिपत्रक क्र. सगृयो-२००१/प्र.क्र.२३४/१४-स,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ३२.
दिनांक ७ नोव्हेंबर, २००५.

**वाचा :-** १) शा.प. क्र. सगृयो १०८३/३७८५७/२८४/१४-स, दि. १७/१/१९८५
२) शा.परिपत्रक क्र. सगृयो २००१/प्र.क्र.२३४/१४-स, दि. ३०/७/०४

**परिपत्रक :-**

शासनाच्या दि. १७/१/१९८५ च्या परिपत्रकानुसार एका इमारतीसाठी एक गृहनिर्माण संस्था ही सहकार आयुक्तांची शिफारस मान्य करण्यात आली आहे व त्यानुसार सर्व निबंधकांना कळविण्यात आलेले आहे. सदर परिपत्रकानुसार विंगनिहाय सहकारी गृहनिर्माण संस्थांची नोंदणी करता येत नाही. मात्र सभासदांकडून काहीवेळा अशा संस्थांची मागणी करण्यात येते.

२. सदर वस्तुस्थिती लक्षात घेऊन सहकार आयुक्तांकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार विंगनिहाय सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीस शासन परिपत्रक समक्रमांक दि ३०/७/०४ मधील निकषानुसार परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार विंगनिहाय सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी करताना विहीत केलेले निकष तपासून संस्था नोंदणी होणे का गरजेचे आहे या कारणमिमांसेसह प्रस्ताव शासनास सादर करण्यास सूचित केले होते.

३. विंगनिहाय संस्था नोंदणीचे प्रस्ताव शासनस्तराऐवजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे स्तरावर ठेवल्यास नियमित नोंदणीप्रमाणेच विंगनिहाय संस्थांची नोंदणी जिल्हा उपनिबंधक स्तरावर झाल्यास अनावश्यक दिरंगाई टळू शकेल या हेतूने आता सदर प्रस्ताव **शासनस्तराऐवजी जिल्हा उपनिबंधक स्तरावरच** अंतिम करण्यात यावेत असा शासनानें निर्णय घेतला आहे.

४. विंगनिहाय सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी करताना सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नोंदणी संदर्भातील आवश्यक त्या सर्व बाबी तपासून तसेच दि. ३०/७/०५ च्या परिपत्रकातील निकषांस अधिन राहून संस्था नोंदणीची कार्यवाही करावी.

(चंद्रकांत सणगर)
उप सचिव , महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रत,

सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था,
सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
सर्व तालुका उप/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
निवड संग्रह.

C & R
19 NOV 2005